... पी. ई. रॉबर्टस म्हणतात, 'Inspite of his final failure, Dupleiu is a striking and brilliant figure in Indian history.... He raised the Presteige of France in East for some Years to an amazing height.'

अशाही परिस्थितीत बोरडेनने डुप्लेला अडचणीत आणले. भारतीय राजकारणाची विशेष माहिती करून न घेता लालीने चुकीचे निर्णय घेतले. हैदराबाद सोडून मद्रासकडे येण्याची चूक केली. या चुका सेनाधिकाऱ्याच्या होत्या. या चुकापेक्षाही खरा दोष फ्रेंच राज्यकर्त्यांच्या लहरी वर्तनाला दिला पाहिजे. कारण स्वदेशनिष्ठ डुप्लेला फ्रेंच सरकाने देशद्रोही ठरविले; तर लालीसारख्या सेनापतीला फासावर चढविले. या कृत्यातूनच फ्रेंच राज्यकर्त्यांची अनादर वृत्ती लक्षात येते.

**५) इंग्लंडचे बलाढ्य नाविक दल :-**

१८ व्या शतकात इंग्लंडचे आरमार उत्कृष्ट दर्जाचे होते. भारताच्या पूर्व व पश्चिम किनाऱ्यावर चेन्नई कोलकत्ता आणि मुंबई ही महत्त्वाची बंदरे इंग्रजांच्या ताब्यात होती. फ्रेंचांकडे फक्त पाँडिचेरी हे एकमेव बंदर होते. तेही इंग्रजांनी जिंकून घेतले. यावरून फ्रेंचांचे नाविक दल दुय्यम दर्जाचे होते हेच सिद्ध झाले. त्यामुळे ब्रिटिशांच्या बलाढ्य नाविक दलासमोर फ्रेंचांना नांगी टाकण्याशिवाय दुसरा पर्याय शिल्लक नव्हता.

**भारतात ब्रिटिश सत्तेची स्थापना :-**

इंग्रजांनी भारतात 'ब्रिटिश ईस्ट इंडिया' कंपनीची स्थापना केल्यापासून ते १७५७ पर्यंत व्यापार वाढविण्यावर भर दिला. त्या अनुषंगाने भारतात अनेक व्यापारी केंद्रे निर्माण झाली. व्यापार सुरक्षेसाठी इंग्रजांनी तलवार व इतर शस्त्रास्त्रांचा वापर केला. हा व्यापार करतांना युरोपातील पोर्तुगीज, डच, फ्रेंच यांचाही कायमचा बंदोबस्त केला. व्यापार सुरक्षित झाल्यानंतर इंग्रजांचे लक्ष आता भारतातील स्थानिक सत्ताधीशांच्या तखताकडे लागले. इ.स. १७५७ पासून त्यांनी Devide and Rule- 'फोडा आणि झोडा' या नीतीचा अवलंब करण्यास सुरवात केली. याचा प्रारंभ बंगाल या सुपीक प्रदेशापासून केला. तात्पर्य, या राजकीय प्रवासाचा आरंभबिंदू म्हणजे बंगाल हा होय.

इ.स. १७०७ मध्ये मोगल बादशाह औरंगजेब याचा मृत्यू झाला. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मोगल राजवट कर्तृत्वहीन बनली. प्रशासनही दुबळे झाले. बंगाल हा प्रदेश मोगल साम्राज्याचा दुवा होता. औरंगजेबच्या मृत्यूनंतर मोगल बादशाह फरूखसियर हा

Scanned with OKEN Scanner

गादीवर होता. इ.स. १७४० ते १७५६ या काळात बंगालचा सुभेदार फ
अलिवर्दीखानाची नियुक्ती केली. बादशहा फरूखसियरने ईस्ट इंडिया कंप
बंगालमध्ये काही प्रमाणात व्यापारी सवलती दिल्या होत्या; परंतु कंपनी
व्यापाराबाबत जकातमुक्तीचा अधिकार कंपनीला मिळाला होता. हीच फ
बंगालचा नवाब व इंग्रज यांच्यातील अंतर्गत संघर्षाला कारणीभूत ठरली. इंग्र
दिवसेंदिवस वाढत चाललेले व्यापारी वर्चस्व नवाबाला मान्य नव्हते. बंगाल
नवाब म्हणून सिराजुद्दौल्ला हा होता. वाढत्या व्यापारात कोठेही जका
फर्मान लागू केले नव्हते. जकात माफीचे फर्मान फक्त कंपनीच्या मालासाठी हो
या फर्मानाचा गैरवापर इंग्रज खासगी व्यापारासाठी करत असत.

**बंगालचा नवाब (सिराजुद्दौला) व इंग्रज :-**

इ.स. १७०७ मध्ये औरंगजेबाचा मृत्यू झाला. मोगल साम्राज्याचे विभा
होऊन अनेक प्रादेशिक सत्ता उदयास आल्या. बंगाल हा मोगल साम्राज्याचा मुख्य सु
होता. अलिवर्दीखानाने इ.स. १७४० मध्ये स्वातंत्र्य पुकारून स्वतंत्रपणे बंगाल
कारभार पाहण्यास सुरवात केली. त्या वेळी बंगालमध्ये इंग्रज, फ्रेंच आणि डच 
राष्ट्रांच्या वखारी होत्या. आलिवर्दीखानाने या तीनही वखारींना आश्रय दि
होता. एप्रिल १७५६ मध्ये अलिवर्दीखानाचा मृत्यू झाला. याचवर्षी सिराजुद्दौ
हा बंगालचा नवाब म्हणून सत्तेवर आला. इंग्रज आणि नवाब सिराजुद्दौ
यांच्यात संघर्षाला सुरवात झाली. या संघर्षाची नानाविध कारणे पुढीलप्रमा
होती.

१) नवाबाच्या परवानगीशिवाय इंग्रजांनी कोलकत्ता व हुगळी या ठिकाणी तटबंदी बांधण्यास सुरवात केली होती.

२) मोगल बादशहा फरूखसियर यांच्याकडून १७१७ मध्ये इंग्रजांनी करमुक्त व्यापाराचा परवाना मिळविला होता.

३) कंपनीने किल्ल्याच्या मजबुतीकरणाचे कामही चालू केले होते.

४) नवाबाच्या भ्रष्ट दोषी अधिकाऱ्यांना कंपनीने आश्रय दिला होता.

इंग्रज आपले वर्चस्व वाढविण्यासाठी अलिवर्दीखानाच्या कारकिर्दीपासूनच प्रयत्नशी
होते. सिराजुद्दौला हा अलिवर्दीखानइतका मुत्सद्दी व महत्त्वाकांक्षी नाही असे इंग्रजां
वाटत होते; त्यामुळे इंग्रजांनी आपले धोरण ताठर केले. सिराजुद्दौला इंग्रज आ
बंगालचा नवाब यांच्यात संघर्षाला सुरवात झाली. सिराजुद्दौलाने इंग्रजाच्या राजकी
हालचाली ओळखून विल्यम फोर्ट या किल्ल्याला बांधलेली तटबंदी पाडण्याचा आदे
दिला. इंग्रजांनी या आदेशाला न ...

केला. या घटनेनंतर इंग्रज गव्हनेर ड्रेक पळून ... लागलेल्या इतर इंग्रज सैनिकांना नवाबाने एका बंद खोलीत डांबून ठेवले. या खोलीला खिडक्या व इतर दरवाजे नव्हते. त्यामुळे ऑक्सिजनचा पुरवठा झाला नाही. एका खोलीत १४६ इंग्रज युद्धकैद्यांना पशूप्रमाणे डांबण्यात आले. यातील १२६ जणांचा आक्सिजनअभावी गुदमरून मृत्यू झाला. या घटनेला इतिहासात अंधारकोठडीची दुर्घटना (ब्लॅक होल दुघर्टना) या नावाने ओळखले जाते. या अचानक झालेल्या हल्ल्यासमोर इंग्रजांचे सामर्थ्य दुबळे ठरले. हॉलवेल हा इंग्रज अधिकारी नवाबाला शरण आला. २० जून १७५६ रोजी फोर्ट विल्यम हा किल्ला सिराजच्या ताब्यात आला; परंतु सिराजला मिळालेला हा आनंद क्षणभंगुर ठरला.

कोलकत्ता आपल्या हातचे गेल्याची बातमी इंग्रजांना पोहोचली. नवाबापेक्षा कंपनीचे नाविक सामर्थ्य मोठे होते. कोलकत्ता परत घेण्यासाठी मद्रासहून वॉटसन व रॉबर्ट क्लाईव्ह या दोन अधिकाऱ्यांना सुसज्ज लष्करासह पाठविण्यात आले. फ्रेंचांना इंग्रजांनी यापूर्वीच या भागातून हुसकावून लावले होते. हुसकावून लावलेल्या फ्रेंचांना सिराजने आश्रय दिला. या घटनेचा क्लाईव्हला राग आला होता. बंगालमधील इंग्रजांची सत्ता सुरक्षित राहण्यासाठी सिराजुद्दौलाऐवजी आपल्या मर्जीतील नवाब नेमला पाहिजे असे वाटू लागले. त्यामुळे क्लाईव्हने नवाबासोबत साम-दाम-दंड या भेदनीतीचा अवलंब केला. त्यादृष्टीने क्लाईव्हने नवाबाच्या दरबारातील मीर जाफर याच्याशी संधान साधले. याशिवाय सिराजच्या राजवटीवर नाखूष आसलेले धनाढ्य व्यापारी रायदुर्लभ, जगतशेट, माणिकचंद हेदेखील या कटात सामील झाले. कलकत्त्याचा भ्रष्ट अधिकारी माणिकचंद यास क्लाईव्हने लाच देऊन कोलकत्ता शहराचा ताबा घेतला. मार्च १७५७ मध्ये क्लाईव्हने चंद्रनगरवर आक्रमण करून फ्रेंचांचे बंगालमधील अस्तित्व संपुष्टात आणले. ब्रिटिशांचे दिवसेंदिवस वाढत असलेले बळ पाहून नवाब कोणतीही कार्यवाही करू शकला नाही. नवाबाची दुर्बलता, कच्चे दुवे, उणिवा यांच्या शोधात क्लाईव्ह होताच. नवाबाला पदावरून हटविण्यासाठी कंपनीचे अधिकारी निमित्त शोधत होते. ते निमित्त म्हणजेच प्लासीची लढाई होय.

**प्लासीची लढाई (१७५७) :-**

प्लासीची लढाई ही आधुनिक भारताच्या इतिहासात महत्त्वपूर्ण समजली जाते.

Scanned with OKEN Scanner

या युद्धाने इंग्रजांचे भारतात पाय रोवले गेले व येथूनच पुढे त्यांनी राजकीय विस्ताराला सुरवात केली. प्लासीच्या युद्धाचा आढावा थोडक्यात खलीलप्रमाणे घेता येतो.

रॉबर्ट क्लाईव्ह हे इंग्रजांचे भारतातील दूरदृष्टी असलेले मातब्बदार सेनापती होता. बंगालच्या नवाब पदावरून सिराजला हटविण्याचा त्यानी वसा घेतला होता. यासाठी त्याने साम-दाम-दंड या भेदनीतीचा सर्रास वापर केला. हे कृत्य करण्यासाठी क्लाईव्हने सिराजुद्दौलाच्या विरोधी गटातील लोकांना हाताशी धरले. नवाब सिराजुद्दौलाचा सेनापती मीर जाफरला नवाब पदाची लालूच दाखविली. यासाठी अमीनचंद या व्यापाऱ्याने दलालाची भूमिका पार पाडली. मीर जाफर व क्लाईव्ह यांच्यात गुप्तपणे करार झाला. तो थोडक्यात खालीलप्रमाणे होता.

कटाची तयारी पूर्ण होताच क्लाईव्हने आपल्या सैन्यासह सिराजुद्दौलावर आक्रमणाची तयारी केली. इंग्रजांच्या तुलनेत नवाबाचे सैन्य सामर्थ्य मोठे होते. ही सैन्यातील लढाई झाली असती तर इंग्रजी सत्तेचे याच वेळी भारतातून उच्चाटन झाले असते; परंतु मीर जाफरने क्लाईव्हला एक पत्र लिहून पाठविले होते. त्यातील मजकूर खालील प्रमाणे होता. मी नवाबचा सेनापती व माझ्याकडील ५०,००० सैन्य ऐन युद्धाच्या वेळी निष्क्रिय राहील. या पत्राने क्लाईव्हचा आत्मविश्वास द्विगुणित झाला. मीर जाफरची ही कृती देशद्रोहीपणाची होती; परंतु मध्ययुगात औरंजेबाच्या मृत्यूनंतर अंतर्गत कलहाला उधाण आले होते. हे अंतर्गत कलहाचे उधाण व जाफरने क्लाईव्हला लिहिलेले पत्र यामुळे क्लाइव्हचा आत्मविश्वास वाढला. खऱ्या अर्थाने युद्धाच्या पूर्वीच क्लाईव्हचा विजय झाला होता; गुफ्तगूनुसार २३ जून १७५७ रोजी मुर्शिदाबादपासून जवळ असलेल्या प्लासी या ठिकाणी उभय सैन्यात संघर्ष झाला. सिराजकडून तोफांच्या माऱ्याने युद्धास प्रारंभ झाला असला, तरीही हे युद्ध कुचकामी ठरले. मीर जाफरने युद्धात कठपुतळी बाहुलीसारखी भूमिका बजावली. फारसा संघर्ष न होताच प्लासीच्या युद्धात क्लाईव्हचा विजय झाला. याचा अर्थ क्लाईव्ह फारच हुशार किंवा युद्ध जिंकण्यात पटाईत नव्हता; तर मीर जाफरने नवाबाविरुद्ध (सिराजुद्दौला) केलेला हा विश्वासघातकी कट होता.

**प्लासीच्या युद्धाची कारणे :-**

प्लासीच्या युद्धात कंपनीचा सेनापती रॉबर्ट क्लाईव्हचा विजय झाला. नवाब सिराजुद्दौला बंगालच्या गादीवरून पायउतार झाला. ही घटना कोणत्या एका ठरावीक कारणामुळे झाली असे नव्हे तर त्याला आनेक कारणांची शृंखला होती, ती प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत.

Scanned with OKEN Scanner

१) औरंगजेबाचा मृत्यू :-

इ.स. १७०७ हे वर्ष भारताच्या राजकीय इतिहासासाठी निर्णायक ठरले. मोगल साम्राज्याला तडा जाऊन अनेक प्रादेशिक सत्ता भारतात उदयास आल्या. इ.स. १७१९ ते इ.स. १७४८ या काळात महम्मदशहा हा दिल्लीचा बादशहा होता. या काळात बंगाल, बिहार आणि ओरिसा हे पूर्वेकडील प्रांत मध्यवर्ती सत्तेपासून अलग झाले. इ.स. १७४० मध्ये अलिवर्दीखान हा राजकीय दृष्ट्या बंगालचा मोगल अधिकारी होता. त्याने स्वातंत्र्य पुकारून स्वतंत्रपणे बंगालचा कारभार पाहण्यास सुरवात केली. याच काळात बंगालमध्ये फ्रेंच, डच, इंग्रज यांच्या वखारी होत्या. अलिवर्दीखानच्या मृत्यूनंतर १७५६ मध्ये सिराजुद्दौला हा बंगालचा नवाब झाला. सिराजुद्दौलाने कंपनीच्या वाढत्या राजकीय हस्तक्षेपाला विरोध केला. यातूनच इंग्रज आणि नवाबाचे संबंध बिघडले व युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली.

२) ब्लॅक होल दुर्घटना :-

सिराजुद्दौला बंगालचा नवाब झाल्यापासून कंपनी व नवाब यांच्यात वितुष्ट निर्माण झाले. कंपनीचा विस्तार वाढावा म्हणून कंपनीने विल्यम फोर्ट किल्ल्याच्या तटबंदीचे काम चालू केले, ज्यास नवाबाचा विरोध होता. सिराजने इंग्रजांच्या हालचाली ओळखून नव्याने बांधलेली तटबंदी पाडण्याचा आदेश दिला. इंग्रजांनी हा आदेश पायदळी तुडवत तटबंदीचे काम चालूच ठेवले. नवाबाने इंग्रजांना धडा शिकविण्यासाठी ४ जून १७५६ रोजी काझीमबाजार येथील वसाहतीवर हल्ला चढवून ती आपल्या ताब्यात घेतली. २० जून १७५६ रोजी नवाबाने कोलकत्त्यावर हल्ला केला व तोही प्रांत जिंकून घेतला. त्या काळचा इंग्रजांचा गव्हर्नर ड्रेक पळून जाण्यात यशस्वी झाला. हाती सापडलेल्या १४६ इंग्रज कैद्यांना नवाबाने एका बंद कोठडीत डांबून ठेवले. ऑक्सिजनच्या अभावी येथील १२६ इंग्रज कैद्यांचा मृत्यू झाला. या घटनेलाच ब्लॅक होल दुर्घटना असे संबोधतात. या घटनेचा बदला घेण्यासाठी पुन्हा नवाब आणि क्लाईव्ह यांच्यात संघर्षाला सुरवात झाली. व नवाबाचा भ्रष्ट अधिकारी माणिकचंद याला लाच देऊन शहराचा ताबा क्लाईव्हने घेतला. अशाप्रकारे बंगालच्या नवाब पदावरून सिराजुद्दौलाला हटविण्यासाठी इंग्रज व नवाब यांच्यात १७५७ मध्ये प्लासी येथे युद्ध घडून आले.

३) मीर जाफर :-

रॉबर्ट क्लाईव्हने बंगालचा नवाब सिराजुद्दौलाला सत्ताभ्रष्ट करण्याचा चंग बांधला होता. नवाबविरोधी गटातील लोकांना त्यांनी हाताशी धरले. यांपैकी नवाबाचा सेनापती मीर जाफर याला सत्तासाठी लालच दाखविली. नवाबाच्या ५०,००० सैन्याचा

सेनापती मीर जाफरने रॉबर्ट क्लाईव्हला पत्रात असे लिहिले, की कंपनी आणि नवाबाच्या प्रत्यक्ष लढाईच्या वेळी तो आपल्या सैन्यासह निष्क्रिय राहील. अगदी तसेच वर्तन जाफरने केले. क्लाईव्हचा या लढाईत विजय झाला. याचे मुख्य कारण म्हणजे रॉबर्ट क्लाईव्हची कर्तबगारी नसून मीर जाफरने केलेला सिराजुद्दौलाविषयी विश्वासघात होता.

**४) बंगालची सुपीकता व समृद्धता :-**

बंगाल, बिहार, ओरिसा या प्रदेशाला भारताच्या पूर्वेकडील प्रदेश असे समजत. पूर्वीपासूनच या प्रदेशाला नैसर्गिक वरदान लाभले होते. येथील जमीन अत्यंत सुपीक होती. येथील नद्यांना बारमाही पाणी असल्याने विविध पिकांचे प्रचंड उत्पादन होत असे. १७५० मध्ये इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती झाली. तेथील उद्योगधंद्यांस लागणाऱ्या कच्च्या मालाचा पुरवठा करणारी नैसर्गिक साधन संपत्ती या भागात मुबलक प्रमाणात उपलब्ध होती १७०७ मध्ये औरंगजेबाचा मृत्यू झाला. तेथील स्थानिक शासकाने स्वतंत्र संस्थानाची निर्मिती केली. यावेळी बंगालचा नवाब सिराजुद्दौला हा होता. इंग्रजांचा मनमानी कारभार त्याला मान्य नव्हता. यामुळे या प्रदेशात होणारा इंग्रजांचा हस्तक्षेप थांबविण्यासाठी नवाब व इंग्रज यांच्यात प्लासी येथून जवळच असलेल्या मर्शिदाबाद येथे २३ जून १७५७ रोजी युद्ध घडून आले.

**५) मोगल बादशहाकडून व्यापाराबाबत विशेष अधिकार :-**

मोगल बादशहा औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मोगल राजवटीप्रमाणे प्रशासनही दुर्बल झाले होते. बंगाल हा मोगल साम्राज्याचा मुख्य भाग होता. १७४० ते १७५६ या काळात अलिवर्दीखान हा बंगाल प्रांताचा सुभेदार होता. इ.स. १७१७ मध्ये बादशहा फरुखसियर यांने ईस्ट इंडिया कंपनीला काही प्रमाणात सवलती दिल्या होत्या. बादशहाच्या फर्मानानुसार कंपनीच्या व्यापाराबाबत जकात मुक्तीचा अधिकार कंपनीला मिळाला होता. जकात माफीचे फर्मान फक्त कंपनीच्या मालासाठी होते; परंतु कंपनीचे अधिकारी या फर्मानाचा गैरवापर करून खासगी व्यापारातही सवलती घेत. ही बाब इंग्रज व बंगालचा नवाब सिराजुद्दौला यांच्या संघर्षाला कारणीभूत ठरली.

**६) इंग्रजांचे वाढते सामर्थ्य :-**

अन्य युरोपियनांच्या तुलनेत इंग्रज भारतात सर्वाधिक यशस्वी ठरले. एप्रिल १७५६ मध्ये अलिवर्दीखानाचा मृत्यू झाला. बंगालचा नवाब म्हणून सिराजुद्दौला सत्तेवर आला. बंगालची सुपीकता, समृद्धता ही ब्रिटिशांना झोप येऊ देत नव्हती. बादशहाने दिलेल्या फर्मानाचा गैरवापर करून बंगाल प्रांतात अनेक कामे चालू केली,

Scanned with OKEN Scanner

ठरविले. मीर जाफर हा इंग्रजाच्या ओंजळीने पाणी पितो याची कल्पना इंग्रजांना होती. बंगालच्या नवाबपदी मीर जाफरची नियुक्ती करताच मीर जाफरने मुक्त व्यापाराची परवानगी दिली. मुळातच कर्तव्यशून्य असलेला व आता म्हातारा असलेला नवाब अधिक काही करू शकला नाही. फेब्रुवारी १७६५ मध्ये तो मृत्यू पावला. मीर जाफरच्या कालावधीत इंग्रजांना बंगालमध्ये फौजांना मोकळे रान मिळाले. पळून गेलेल्या मीर कासिमने अयोध्येच्या नवाबाबरोबर युती केली. मोगल बादशहा शहाआलम हादेखील या युतीत सामील झाला होता. या युतीत सामील होण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे बंगाल, बिहार आणि ओरिसा हे मोगल साम्राज्याचे प्रांत होते. मीर जाफर किंवा इंग्रजांचा या प्रांतावर कोणताही हक्क असू शकत नाही असे अयोध्येचा नवाब शुजाउद्दौलाचे मत होते. या सर्व घटनेला मोगल बादशहा शहाआलम यांचा पाठिंबा होता. यातूनच इंग्रज आणि शुजाउद्दौला यांच्यात बक्सारची लढाई घडून आली.

**बक्सारची लढाई १७६४ :-**

मीर कासीम इंग्रजांच्या मदतीने सत्तेवर आला होता; परंतु मीर जाफरप्रमाणे दूधखुळा नसून, तो दूरदृष्टी विचाराचा आणि महत्त्वाकांक्षी होता. बंगालच्या नवाब पदावर येताच त्यांने इंग्रजांना प्रचंड प्रमाणात धन, द्रव्य व बंगालच्या आसपासचा भूप्रदेश दिला होता. थोडक्यात इंग्रजांना दिलेल्या सर्व आश्वासनांची त्याने पूर्तता केली होती. त्यामुळे आपल्या नवाबपदाच्या काळात कंपनीने कसल्याही प्रकारची ढवळाढवळ करू नये या विचाराने वागत होता. त्याने सत्तेवर येताच स्वतंत्रपणे कारभार सुरू केला. मुर्शिदाबाद हे राजधानीचे ठिकाण बदलून मोंगीर केले. त्याच्या या कृत्याचा इंग्रजांना पश्चाताप झाला. नवा नवाब इंग्रजांच्या अपेक्षा पूर्ण करेल ही कंपनीची अपेक्षा फोल ठरली.

मीर कासीमच्या स्वतंत्र हालचाली लक्षात घेऊन कंपनीने बंगालच्या नवाबपदी मीर जाफरची पूनर्नियुक्ती करण्याचे ठरविले. मीर जाफर नवाबपदावर नियुक्त होताच इंग्रजांनी ७ जुलै १७६३ मध्ये तह केला. या तहानुसार इंग्रजांनी मीरजाफर पासून अनेक सवलती मिळविल्या. या तहान्वये बंगालमध्ये इंग्रजांना करमुक्त व्यापाराची सवलत मिळाली. मीर कासीमशी झालेल्या युद्धात इंग्रजांचे जे नुकसान झाले होते, त्याची पूर्णपणे नुकसान भरपाई करण्यात आली. या काळात बंगालमध्ये अव्यवस्था व अराजक निर्माण झाले. अशाच अवस्थेत ५ फेब्रुवारी १७६५ रोजी मीर जाफर मरण पावला. या सर्व घटनांचा परिणाम असा झाला,

की इंग्रजांना एक प्रकारे बंगालमधील ... साठी मुक्त संधी मिळाली. मेजर ॲडम्सकडून पराभूत झालेला मीर कासीम बिहारमार्गे अयोध्ये पोहोचला. मोगल बादशहा शहाआलम अयोध्येसच राहत होता. या वेळे अयोध्येचा नवाब शुजाउद्दौला होता. मोगल बादशहा शहाआलम व अयोध्ये नवाब शुजाउद्दौला या दोघां नाही इंग्रजाशी युद्ध चालू ठेवण्यासाठी आपल्याम सामील करून घेतले. अशाप्रकारे बादशहा शहाआलम, अयोध्येचा नवाब शुजाउद्दौ आणि मीर कासीम या मुसलमान राज्यकर्त्यांची युती झाली. या सर्व राज्यकर्त्यां मिळून बंगालमधून इंग्रजांचे उच्चाटन करण्याचा प्रयत्न केला. ही युती होण्याम त्या तीन राज्यकर्त्यांची वेगवेगळी कारणे होती.

१) मीर कासीमला बंगाल सोडून जावे लालल्याने त्याचे नवाबपद गेले होते.

२) ब्रिटिशांच्या वाढत्या वर्चस्वामुळे अवधचा नवाबही अस्वस्थ होता. इंग्रजां आता उत्तर भारतावर लक्ष केंद्रित केले होते.

३) बंगाल हा सुभा मोगलांच्या वर्चस्वातून गेल्याचे दुःख मोगल बादश शहाआलमला होते.

एकूणच या समान विरोधाच्या धाग्यातून या तीन सत्ता एकत्र आल्या. बंगाल वर्चस्व सिद्ध करण्यासाठी इंग्रजही युद्धास तयार होते. याच युद्धातून बंगालचा स्व कोण? या प्रश्नाचे उत्तर मिळणार होते. या वेळी मेजर ॲडम्स जाऊन त्याच्या ज मेजर कॅर्नाकची नियुक्ती झाली होती. त्याच्या अंगी सेनापतीस आवश्यक असलेले नसल्यामुळे इंग्रज सैन्यात बेबनाव निर्माण झाला. १७६४ च्या सुरवातीच्या कित महिन्यांत इंग्रजांना कोणतेही यश प्राप्त झाले नाही.

मेजर कॅर्नाकला प्रारंभी मोहिमेत अपयश झाल्याने त्याच्या जागेवर कंपन सेनापती हेक्टर मन्रो याची नियुक्ती करण्यात आली. मन्रोने अल्पावधीतच इंग्रज बंड सैनिकांना कठोर शासन करून सैन्यात शिस्त निर्माण केली. मुसलमानी राज्यकर्त्य संयुक्त फौजेला तोंड देण्याचा प्रयत्न केला. अयोध्येचा नवाब शुजाउद्दौलाने यु तयारी केली. शुजाउद्दौलाचा सुरवातीला बिहारवर हल्ला करण्याचा प्रयत्न होता; लष्करी हालचालीच्या दृष्टीने हे ठिकाण महत्त्वाचे नव्हते. म्हणून गाझीपूर पूर्वेला २५ मैलांवर गंगा नदीच्या किनाऱ्यावर वसलेल्या बक्सार या ठिकाण निवड केली. शुजाउद्दौलाने मातीची तटबंदी बांधून आपली संरक्षण सि सिद्ध केली. पावसाळ्याचे दिवस असल्याने प्रत्यक्ष युद्धाला सुरवात झाली न या संधीचा फायदा घेऊन इंग्रजांनी शुजाउद्दौलाच्या गोटातील सैनिकांना लाचलुचप आपल्या बाजूने वळविण्याचा प्रयत्न केला. ... काही अंशी

Scanned with OKEN Scanner

आले. पावसाळा संपताच मेजर मन्रो याच्या नेतृत्त्वाखाली २२ आक्टोबर १७६४ रोजी बक्सारजवळ इंग्रज फौज येऊन थडकली. या फौजेत इंग्रजांकडे ८००० सैन्य आणि २२ तोफा होत्या. शुजाउद्दौलाजवळ ४० हजाराची खडी फौज होती. याशिवाय त्याच्याकडे लष्करात इंग्रज सेनानीच्या नेतृत्वाखाली आधुनिक प्रकारचे लष्करी शिक्षण घेतलेल्या तीन पलटणी होत्या. युद्धाच्या सुरवातीच्या कालखंडात शुजाउद्दौलाला सर्वत्र यश मिळू लागले. विजयाने उत्साहित झालेल्या नवाबाला हा उत्साह दीर्घकाळ टिकवून ठेवता आला नाही. नवाबाच्या लष्करी हालचाली फसू लागल्या. स्वतः शुजाउद्दौला आपल्या सहा-सात हजारांच्या फौजेनिशी अचानकपणे इंग्रज लष्कराकडून पराभूत झाला. त्यानंतर बादशहा शहाआलम इंग्रजांना शरण गेला. पराभूत मीर कासीम निराधार आणि असहाय अवस्थेत दिल्लीकडे पळून गेला. तिकडे तो अत्यंत हाल अपेष्टा भोगत, गेलेली सत्ता परत मिळविण्याच्या व्यर्थ प्रयत्नात भटकत असतानाच इ.स. १७७७ मध्ये दिल्लीजवळ मरण पावला.

बक्सारच्या लढाईनंतर शुजाउद्दौलाचा पाठलाग करून कुराच्या लढाईत इ.स. १७६५ मध्ये ब्रिटिशांनी त्याचा निर्णायक पराभव केला. अयोध्या प्रांतावर आपले राजकीय वर्चस्व स्थापन केले. १७५७ च्या प्लासीच्या युद्धाने इंग्रजांचे भारतात बीजारोपन झाले तर १७६४ च्या बक्सार युद्धाने इंग्रजी साम्राज्याची स्थापना झाली. यावरूनच या युद्धाचे महत्त्व लक्षात येते.

**बक्सारच्या लढाईचे महत्त्व :-**

बक्सारची लढाई आधुनिक भारताच्या इतिहासात इंग्रजांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण समजली जाते. या लढाईने भारतात अनेक महत्त्वपूर्ण बदल घडवून आणले. त्याचा खालील घटकांच्या अनुषंगाने आपणास मागोवा घेता येतो.

**१) नवाब नज्मुद्दौलाची नियुक्ती :-**

५ फेब्रुवारी १७६५ रोजी मीर जाफरचा मृत्यू झाला. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा नज्मुद्दौलाची बंगालचा नवाब म्हणून २० फेब्रुवारी १७६५ रोजी नियुक्ती झाली. या नियुक्तीनंतर ऑगस्ट १७६५ मध्ये त्यांच्याशी तह केला. त्यालाच अलाहाबादचा तह असे संबोधतात, या तहाप्रमाणे बंगालच्या नवाबाचे सर्व अधिकार काढून घेण्यात आले. या तहाने बंगाल प्रांताचे खरे राज्यकर्ते इंग्रज बनले.

**२) क्लाईव्हचे पूनरागमन :-**

इ.स. १७५७ मध्ये प्लासीच्या युद्धात रॉबर्ट क्लाईव्हचा विजय झाला. इ.स. १७६० मध्ये तो इंग्लंडला परत गेला. प्लासीच्या युद्धात त्याने जी कामगिरी बजावली त्या कामगिरीमुळे त्याला 'लॉर्ड' ही उपाधी बहाल करण्यात आली. इ.स. १७६४ मध्ये

Scanned with OKEN Scanner